Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary
Education S.R.No.832-A, Final Plot
No. 178,179, Near Balchitrawani,
Behind Agharkar Research
Institute, Bhamburda,
Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ, स.न.८३२ ए,
फा.प्लॉ.नं.१७८, १७९, बालचित्रवाणी
शेजारी, आघारकर रिसर्च इंन्स्टिट्यूटच्या
मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर,
पुणे-४११००४

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 । EPABX -25705000 ।
Email : secretary.stateboard@gmail.com

जा.क्र.रा.मं./परीक्षा-७/९७४
पुणे - ४११००४
दिनांक- १५/०१/२०२४

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे

**विषय** - मार्च २०२४ मधील माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस प्रविष्ट होणा-या विदयार्थ्यांना शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देणेबाबत.

**संदर्भ** :- १. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय संकीर्ण-२०१६/ प्र.क्र.२०२/ एस.डी.२ दि.२४/११/२०१७
२. कला संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. डिओअे/२०२३-२४/चार/२९३८ दि.२८/१२/२०२३ रोजी चे पत्र.

उपरोक्त विषयी संदर्भिय क्र. १ च्या शासन निर्णयानुसार शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारामध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. सदर शासन निर्णयातील तरतुद क्र.०५ नुसार याबाबतचे प्रस्ताव विद्यार्थ्यांनी शाळेकडे दि.१५ डिसेंबर अखेर व शाळांनी विभागीय मंडळाकडे सदरचे प्रस्ताव सादर करावयाची अंतिम तारीख १५ जानेवारी अशी नमूद आहे

तथापि संदर्भ क्र.२ नुसार कला संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी शासकीय रेखाकला (एलिमेंटरी व इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड) परीक्षा २०२३ चा निकाल जानेवारी २०२४ अखेरपर्यंत जाहीर करण्यात येणार असल्याने शास्त्रीय कला ,चित्रकला व लोककला प्रस्ताव स्विकारण्याच्या मुदतीमध्ये वाढ करण्याबाबत विनंती केली आहे. सदर प्रस्तावास अनुसरून प्रस्ताव स्विकारण्याच्या दोन्ही तारखांना खालीलप्रमाणे मुदतवाढ या वर्षासाठीच देण्यात येत आहे.

| अ. क्र. | करावयाची कार्यवाही | शासन निर्णयानुसार अंतिम दिनांक | वाढीव मुदतीसह नवीन अंतिम दिनांक |
|---|---|---|---|
| १. | विद्यार्थ्यांनी शाळेकडे प्रस्ताव सादर करणे | दि.१५ डिसेंबर | सोमवार, दि.०५ फेब्रुवारी २०२४ |
| २. | शाळांनी विभागीय मंडळाकडे प्रस्ताव सादर करणे | दि.१५ जानेवारी | शनिवार, दि.१० फेब्रुवारी २०२४ |

२/-

तरी उपरोक्त पत्रानुसार सर्व विभागीय मंडळांनी योग्य ती कार्यवाही करावी. सदर मुदतवाढ आपल्या कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक शाळांच्या निदर्शनास आणून देवून त्याप्रमाणे मुदतीत कार्यवाही करण्याबाबत सर्व संबंधितांना सूचित करावे. तसेच आपल्या स्तरावरुन याबाबत प्रसिध्दी देण्यात यावी व कोणताही पात्र विद्यार्थी सदर गुणांच्या सवलतीपासून वंचित राहणार नाही याची संबंधितांनी दक्षता घ्यावी.

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे-४.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर-**

१. मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
२. मा.आयुक्त शिक्षण, शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१.
३.मा.आयुक्त,क्रीडा व युवक सेवा संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे-१५.
४.मा.कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
५.मा.कला संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई - ०१

प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी- व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्यमंडळ, पुणे.

क्र.कोविमं/माध्य.परीक्षा/2830
कोल्हापूर ४१६००४
दिनांक १५/०१/२०२४

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त शाळा
सातारा, सांगली, कोल्हापूर.

विषय: माध्यमिक शालांत (इ.१०वी) प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०२४
शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देणेबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरुन मार्च २०२४ इ.१०वी परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांचे शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला प्रस्ताव सादर करण्यास राज्यमंडळ पुणे यांचे वरीलपत्राप्रमाणे मुदतवाढ देण्यात आलेली असून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

(सुभाष रा. चौगुले)
विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ